# नळदुर्ग व जळकोट मंडळात अतिवृष्टी झाली असून,शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रु तात्काळ मदत द्या - मनसे मागणी



नळदुर्ग (विजय पिसे)–नळदुर्ग व जळकोट महसूल मंडळात सरासरी पेक्षा अधिक पाऊस होऊन अतिवृष्टी झाली आहे.यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पाण्यात गेला आहे. सोयाबीन, उडीद, मूग या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून,प्रशासनाने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नळदुर्ग विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनावर जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे,तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार,नळदुर्ग शहराध्यक्ष अलिम शेख,शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, शिरीष डुकरे, रवी राठोड आदीच्या स्वाक्षरी आहेत.

# आरोग्य कर्मचाऱ्यांनी समायोजनसाठी पडत्या पावसात लाँग मार्च काढीत फोडला टाहो

## पोतराज, वारकरी आदींच्या वेशभूषेत कर्मचारी !




धाराशिव (प्रतिनिधी) – ज्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या १० वर्षे सेवा झालेल्या आहेत. त्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्यांप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास व नगर विकास विभाग तसेच वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागामध्ये समावेशन करण्यात यावे यासह इतर मागण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समितीच्यावतीने जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचे दि.१९ ऑगस्टपासून बेमुदत संप आंदोलन सुरू असून आज दि.२८ रोजीचा १० वा दिवस आहे. मात्र, यावर शासनाने अद्यापही तोडगा काढलेला नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयापासून भर पावसात ओले चिंब होत पोतराज व वारकरी वेशभूषा करीत जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत लाँग मार्च काढीत आर्त टाहो फोडला. जर सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर सर्व कर्मचारी आंदोलन तीव्र करणार असल्याचा इशारा देण्यात आला. दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयापासून निघालेला लाँग मार्च संत गाडगेबाबा चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हा न्यायालय मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी एक वाजण्याच्या सुमारास धडकला. आंदोलकांनी विविध घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. तसेच या आंदोलनाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सभेत रूपांतर झाले.

आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या ज्या अधिकारी व कर्मचारी यांची १० वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे. अशा कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्क्यांप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्राम विकास व नगरविकास विभाग, वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागामध्ये समावेशन करण्यात यावे. तर शासन निर्णय दि.१४ मार्च २०२४ रोजी निर्गमित झाल्यापासून कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समावेशन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे जोपर्यंत शासन स्तरावर पात्र कर्मचाऱ्यांचे समावेशन होईपर्यत, त्यांना सर्व सेवा समायोजीत केलेल्या कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करावेत.

तसेच त्यांना सर्व नियमित शासकिय कर्मचाऱ्यांचे नियम व वेतन आयोगाच्या वेळोवेळी होणाऱ्या शिफारशीनुसार वेतन वाढ करावी किंवा समान काम समान वेतन लागू करावे. ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे रिक्त जागे समायोजन होणार नाही अशा सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचे अधिसंख्य पदे निर्माण करुन समावेशन करावे. त्याबरोबरच ऑक्टोबर नोव्हेंबर २०२३ मधील आंदोलनात ज्या कर्मचाऱ्यावर पोलिस केस दाखल झालेल्या आहेत, त्या रद्द करण्यात याव्यात. तर राष्ट्रीय आयुष मिशन, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, एचबीटी आपला दवाखाना व १५ वा वित्त आयोग नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र इंजिनिअर (विद्युत) अंतर्गत या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानमध्ये रिक्त जागी दि १४/०३/२०२४ शासन निर्णयाप्रमाणे समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात यावा. तर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या सेवा कालावधी ६ वर्षे पुर्ण झाल्यानंतर कंत्राटी सेवा नियमित करण्याचा निर्णय सर्वाना लागू करण्यात यावा. तर नागपूर, गोंदिया व जालना जिल्ह्यातील सपोर्ट स्टाफ समायोजन नियुक्ती आदेशाची अंमलबजावणी करावी, त्यांना तातडीने रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे समकक्ष पद व समान शैक्षणिक पद समायोजनास नसेल तर या कर्मचारी यांच्या सेवा समायोजनासाठी वित्त विभागाचा शासन निर्णय दि. १५ जुलै २०२५ नुसार आकृतीबंधमध्ये नवीन पद निर्माण करावे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत उपकेंद्राच्या प्रस्तावीत आकृतीबंदमध्ये कंत्राटी समुदाय आरोग्य अधिकारी असे प्रस्तावीत केले आहे. त्याऐवजी नियमित समुदाय आरोग्य अधिकारी पद निर्माण करावे. तरी कंत्राटी आयुष वैद्यकिय अधिकारी (BMS), RBSK वैद्यकिय अधिकारी यांचे गट–ब वैद्यकिय अधिकारी म्हणून आयुर्वेदिक डिस्पेंसरी, प्रा. आ. केंद्र, ग्रा.रु.व उपजिल्हा रुग्णालय, रुग्णालय, वैद्यकिय शिक्षण विभाग, महानगरपालिका, जिल्हा कारागृह विभागात समान शैक्षणिक अर्हतेनुसार आणि BHMS, BUMS यांना वैद्यकिय अधिकारी गट–ब यांना RH, SDH व DH येथे समायोजन करावे, आदी मागण्यांसाठी हे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनामध्ये जीवन कुलकर्णी, किरण बारकुल, डॉ. विलास तोडकर, सतीश गिरी, किरण तानवडे, किशोर गवळी, अशोक चव्हाण, किशोर तांदळे, अमर सपकाळ, कलीम शेख, मुकुंद उंबरे, गणेश चव्हाण, शरद हिंगमीरे, शर्मिला ठवरे, पठाण, रणखांब, सस्ते, गाढवे, विनोद मोरे, सुरेश पाटील, डॉ विक्रांत राठोड, गणेश चव्हाण, संतोष पोतदार, बाळासाहेब कोळेकर, विश्वजित जगदाळे, अमृत कुंभार, डॉ सागर कुंभार आदींसह महिला व पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

# वाशीतील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी; कृषी विभागाकडून पंचनामेही सुरू



धाराशिव (प्रतिनिधी)– जिल्ह्यात १४ ऑगस्टपासून अनेक भागात दमदार पाऊस झाले आहेत. काही महसूल मंडळात अतिवृष्टीही झालेली आहे. त्याचा पिकांना चांगलाच तडाखा बसला आहे. २२ ऑगस्टपर्यंत तब्बल ९२ हजार ३७२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. कृषी व महसूल विभागाकडून पंचनामेही युध्दपातळीवर केले जात आहेत. त्यातील केवळ ४० टक्के पिकांचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात १४ ऑगस्ट रोजी कळंब व वाशी तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झाली होती. भूम तालुक्यातील चार महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली होती. अतिवृष्टी व संततधार पावसामुळे नद्याही दुथडी भरुन वाहू लागल्या होत्या. पाऊस व नद्याच्या पुरामुळे पिकेही पाण्याखाली गेली होती. त्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. २२ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यातील २३१ गाव शिवारातील ९२ हजार ३७२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याची नोंद प्रशासनाकडे आहे. हा अहवाल प्राथमिक स्वरुपाचा असल्याने यातही आणखी क्षेत्र वाढण्याचा अंदाज आहे. कृषी व महसूल विभागाकडून पिकांचे पंचनामेही सुरु केली आहेत. कृषी सहायक, तलाठी व ग्रामसेवक बांधावर जाऊन पंचनामे करण्यात व्यस्त आहेत. आतापर्यंत ३७ हजार हेक्टरवरील पिकांचे पंचनामेही पूर्ण केले आहेत. एकूण नुकसान झालेल्या पिकांपैकी ४० टक्के क्षेत्रावरील पिकांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. जिल्ह्यात झालेल्या दमदार पावसामुळे १०६ घरांना फटका बसला आहे. यामध्ये अनेक घरांच्या भिंती कोसळल्याने घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य भिजून नुकसान झाले आहे. यामुळे अनेक नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# शहरासह शेत शिवारात झुकले विद्युत पोल; शेतकऱ्यांना धोका



उमरगा(प्रतिनिधी)– तालुक्यात निसर्गाचे ऐनवेळी येणारे संकट त्यात ओलिताखाली शेती क्षेत्रास कराव्या लागणाऱ्या धावपळीमध्ये शेतकऱ्यांना अनेक आव्हानाला सामोरे जावे लागत आहे.कधी दुष्काळ, नापिकी याने शेतकरी आत्महत्या करत आहेत. ग्रामीण भागात कायम भारनियमन पाचवीला पुजलेले आहे. प्रतीक्षा करूनही जोडणी मिळत नसल्याने जीव धोक्यात घालून तात्पुरत्या विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात असताना सहा वर्षापूर्वी कडदोरा शिवारात शेतकरी बाप व मुलाचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू झाला. शहरासह ग्रामीण भागासह शेतात झुकलेले खांब व लोंबकळणाऱ्या तारांचा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या वर्षी तालुक्यातील औराद येथील शेतकरी नागोराव गायकवाड यांच्या शेतामध्ये विद्युत वाहिनीचा धक्का लागून बैलाचा मृत्यू झाला आहे. महावितरणच्या भोंगळ कारभारावर वारंवार अर्ज आणि तक्रार देवून दखल घेतली नसल्याने अखेर दुर्दैवी घटना घडली. तालुक्यात कोरडवाहू शेतीचे क्षेत्र सर्वाधिक आहे. तर शेती सिंचनाखाली येण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याचा पर्याय उपलब्ध करून घ्यावा लागतो आहे. गेल्या तीन वर्षापासून महावितरण कंपनीकडे प्रस्ताव दाखल करीत अनामत रक्कमेचा भरणाही केला. मात्र, अद्याप जोडणी देण्यात आली नसल्यामुळे पिके जगवण्यास मोठी कसरत करावी लागते त्यामध्ये भारनियमनाचा खोडा सतावत आहे.

तालुक्यात मागील काळात उभारण्यात आलेले विजेचे पोल निकृष्ट कामामुळे बहुतांश ठिकाणी झुकलेले असून विजेच्या तारांना जागोजागी झोळ पडला आहे. मात्र,दुरूस्तीकडे दुर्लक्ष केले जात आहे. याबाबत वीज लाईनमन, महावितरण विभाग तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. एखाद्याचा जीव गेल्यावर महावितरण लोकप्रतिनिधींना आठवण होणार की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेत शिवारातील समस्यासोबतच अनेक गावात अशीच परिस्थिती दिसून येत असल्याने वादळ वाऱ्यात वीज पुरवठा खंडित होत असल्याने दाबका येथील ग्राहकांनी गेल्या तीन वर्षापासून कंपनीकडे वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात येतेय मात्र तात्पुरती डागडुजी करून विद्युत पुरवठा सुरू करण्यात येत आहे. उमरगा शहरातील अनेक भागात विज वाहिनीची अवस्था बिकट झाली असून काही ठिकाणी हजार फूट अंतरापेक्षा अधिक अंतर दूर विद्युत पोल नसल्याने बांबूचे आधारावर घरगुती विद्युत जोडणी देण्यात आली.

शहरात नव्याने बांधकाम झाल्याने विज वाहिनी घराला लागून तर शहरातील घरावरुन, घरालगत लागून गेलेल्या विद्युत तारेमुळे या पूर्वी दोघांचा मृत्यू झाला. पोलवरील गुंतागुंतीच्या तारा विद्युत जोडणीमुळे झिरो लाईनमन ही दगावले, जखमी झाले आहेत. कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कंपनी व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने धोका कायम आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक मनोहर फुटाणे यांचे निधन



धाराशिव (प्रतिनिधी)– तालुक्यातील पळसप येथील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक मनोहर जयदेव फुटाणे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी बुधवारी (दि.२७) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणाचे होते. त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. ते पत्रकार विलास फुटाणे यांचे वडील होत.

# ४० लिटर गावठी अवैध दारु पकडली

कळंब (प्रतिनिधी)– पोलीस ठाण अंतर्गत नितीन रा.भिमनगर कळंब हे दि.२७.०८.२०२५ रोजी कळंब शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे बाजूला असलेल्या लिंबाचे झाडाखाली अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.पोलीस अधिक तपास करीत ओहत.

**लातूर समाचार उस्मानाबाद**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649